# डिसेंबरमध्ये सुरू होणाऱ्या मेट्रोला नवव्या गाडीची प्रतीक्षा

## आरे-बीकेसी टप्प्यासाठी अंतिम चाचणी अत्यावश्यक



म. टा. खास प्रतिनिधी

**मुंबई :** येत्या डिसेंबरमध्ये सुरू होणाऱ्या व राज्यातील पहिली भूमिगत मार्गिका असलेल्या मेट्रो ३ मार्गिकेला नवव्या गाडीची प्रतीक्षा आहे. डिसेंबरमध्ये ही मार्गिका सुरू करायची असल्याने नोव्हेंबरमध्ये आरे ते बीकेसी या पहिल्या टप्प्यासाठीच्या गाडीची अंतिम चाचणी होणे अत्यावश्यक आहे. त्याआधी ही नववी गाडी ताफ्यात येणे अपेक्षित आहे.

मेट्रो ३ मार्गिका ही उत्तर मुंबईला दक्षिण मुंबईशी पश्चिम उपनगरांतून जोडणारी आरे ते कफ परेड, अशी मार्गिका आहे. या ३३ किमी लांबीच्या मार्गिकेवर एकूण २७ स्थानके आहेत. त्यापैकी २६ स्थानके भूमिगत असतील. मार्गिकेचा पहिला टप्पा आरे ते बीकेसी असा असेल. हा टप्पा येत्या डिसेंबरपासून सुरू करण्याच्यादृष्टीने या मार्गिकेसाठीच्या गाड्या या महिन्याच्या सुरुवातीला सज्ज करण्यात आल्या. त्यामध्ये आठ डब्यांच्या दोन गाड्या एकूण १७ किमी चालवून डबे व रूळ सुरळीत असल्याचे निदान करण्यात आले. मात्र नववी गाडी ताफ्यात येण्याची प्रतीक्षा कायम आहे.

या मार्गिकेचा दहा स्थानकांचा पहिला टप्पा डिसेंबरमध्ये कार्यान्वित करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. या पहिल्या टप्प्यात प्रत्येकी आठ डब्यांच्या नऊ गाड्यांची गरज आहे. त्यापैकी आठ गाड्याच ताफ्यात आल्या असून नववी गाडी पुढील १५ दिवसांत ताफ्यात येण्याची गरज संबंधितांनी व्यक्त केली आहे. या गाड्या अल्स्टॉम इंजिनीअरिंग या कंपनीकडून आंध्र प्रदेशातील अमरावती येथील औद्योगिक वसाहतीत तयार होत आहेत. ही नववी गाडी वगळल्यास पहिला टप्पा सुरू करण्याच्यादृष्टीने आवश्यक असलेली उर्वरित सर्व सामग्री सज्ज आहे.

### पुढील महिन्यात अंतिम चाचणीची गरज

डिसेंबरमध्ये मार्गिका सुरू होण्याआधी आरे ते बीकेसी, अशा पूर्ण मार्गिकेची अंतिम चाचणी होणे अत्यावश्यक आहे. त्यामध्ये पूर्ण आठ डब्यांची गाडी विविध वेगावर चालवली जाईल. नववी गाडी ताफ्यात आल्यानंतर ही चाचणी होईल, असे सूत्रांचे म्हणणे आहे.

मेट्रो ३ मार्गिकाच्या पहिल्या टप्प्यातील भुयारीकरण १०० टक्के पूर्ण झाले आहे. स्थानकांची उभारणी ९८ टक्के पूर्ण झाली असून चार स्थानके जवळपास सज्ज आहेत. प्रणालीशी निगडित कामे मात्र ८५ टक्के पूर्ण झाली आहेत.

### आरे कारशेडची तयारी

मेट्रो ३मधील गाड्यांची दुरुस्ती आरे येथील बहुचर्चित कारशेडमध्ये होणार आहे. वास्तवात कारशेडची उभारणी मार्गिकेच्या विलंबाने सुरू झाली. त्यामुळे पहिला टप्पा सुरू होईपर्यंत कारशेड उभे नसल्यास पहिल्या टप्प्यासाठी आवश्यक असलेला नियंत्रण कक्ष बीकेसी येथे सुरू करण्याची तयारीही करण्यात आली आहे. मात्र पहिल्या टप्प्यासोबतच आरे कारशेड सुरू व्हावे, यासाठी त्याची उभारणी जोमाने सुरू आहे. आवश्यक ती सर्व सामग्री कारशेडमध्ये आली असून उभारणी निम्म्याहून अधिक पूर्ण झाल्याचे सूत्रांनी सांगितले.